रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ८८
www.ramprahar.com

◆ बुधवार, १५ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने १२ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

'खारेपाटातील पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करावा'/२
महाडमध्ये खैराची अवैध वाहतूक पकडली/२
पनवेल महापालिकेचा राज्य शासनाकडून सन्मान/४

## गायिका मैथिली ठाकूरचे भाजपसोबत जुळले सूर



**पाटणा :** सुप्रसिद्ध लोकगायिका मैथिली ठाकूर हिने भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. बिहार भाजपचे प्रदेशाध्यक्ष दिलीप जायसवाल यांच्या उपस्थितीत तिला पक्षाची सदस्यता देण्यात आली. सूत्रांच्या माहितीनुसार मैथिलीला दरभंगामधील अलीनगर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. लोकसंगीतातून ओळख निर्माण केलेल्या मैथिलीच्या प्रवेशामुळे भाजपमध्ये नवा उत्साह दिसून येत आहे. मैथिलीचा चाहतावर्ग मोठा आहे. तिच्या लोकप्रियतेचा फायदा भाजपला होऊ शकतो. तिच्यासोबत भभुआ येथील राजदचे आमदार भरत बिंद यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. या वेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष दिलीप जायसवाल म्हणाले की, विपक्ष आता नैराश्यात आहे. जनतेचा विश्वास भाजपवर आणि एनडीएवर अधिक बळकट झाला आहे.

# नक्षल चळवळीला हादरा!

## वरिष्ठ नेता भूपतीची ६० साथीदारांसह शरणागती

**गडचिरोली : प्रतिनिधी**

दीर्घकाळ नक्षल चळवळीत सक्रिय राहून पॉलिट ब्युरो आणि केंद्रीय समितीपर्यंत पोहचलेल्या वरिष्ठ नक्षलवादी नेता मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती उर्फ सोनू याने अखेर आपल्या ६० साथीदारांसह गडचिरोली पोलिसांसमोर शरणागती पत्करल्याची माहिती समोर आली आहे. त्याच्यावर विविध राज्यांत मिळून १० कोटी रुपयांहून अधिक बक्षीस होते.

भूपती हा नक्षलवादी संघटनेचा प्रभावशाली रणनीतिकार मानला जातो. तो अनेक वर्षे महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील प्लाटूनचा मार्गदर्शक म्हणून कार्यरत होता, मात्र गेल्या काही महिन्यांपासून त्याच्यात आणि संघटनेच्या शीर्ष नेतृत्वात मतभेद वाढले होते. भूपतीने सशस्त्र संघर्ष निष्फळ ठरल्याचे मान्य करून शस्त्रसंधीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले होते. जनाधार घटला, शेकडो सहकाऱ्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे संघर्ष नव्हे; तर संवादच पर्याय आहे, असे त्याने एका पत्रकात म्हटले होते.



भूपतीच्या या भूमिकेला काही नक्षल नेत्यांनी विरोध केला. त्यांनी संघटनेचा महासचिव थिप्पारी तिरुपती उर्फ देवजी याच्या नेतृत्वाखाली लढा सुरू ठेवण्याची भूमिका घेतली होती, मात्र केंद्रीय समितीने भूपतीवर दबाव आणून शस्त्र खाली ठेवण्याचे आदेश दिले. यानंतर त्याने संघटनेतून बाहेर पडत असल्याची घोषणा केली आणि अखेर आपल्या ६० साथीदारांसह गडचिरोली पोलिसांसमोर शरणागती पत्करली.

या घटनेची अधिकृत पुष्टी अद्याप पोलिसांकडून करण्यात आलेली नसली तरी गडचिरोली पोलीस दलाच्या सूत्रांनी या हालचालींची माहिती दिली आहे. भूपती आणि त्याचा गट सध्या पोलिसांच्या संरक्षणाखाली असल्याचे कळते. शासनाच्या आत्मसमर्पण व पुनर्वसन योजनेंतर्गत त्यांना सुरक्षिततेची हमी देण्यात आली आहे.

### आत्मसमर्पणाची मालिका

*गेल्या काही महिन्यांपासून गडचिरोली जिल्ह्यात आत्मसमर्पणाचा क्रम सुरूच आहे. जानेवारीत भूपतीची पत्नी आणि वरिष्ठ नेत्या तारक्का हिने आत्मसमर्पण केले होते. भूपतीची शरणागती या संपूर्ण प्रवाहातील सर्वात मोठा टप्पा मानला जात आहे. १५ ऑक्टोबरला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर तो आत्मसमर्पण करणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. भूपतीसमवेत नक्षल्यांचे दंडकारण्यातील नेते निखिल, प्रभाकर व राजू यांच्यासह ६० नक्षली आत्मसमर्पण करणार आहेत.*

## जि.प., पं.स.मध्ये स्वीकृत सदस्यांच्या नेमणुकीची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेत पाच आणि पंचायत समितीमध्ये दोन सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी विनंती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे या सुधारणेनंतर ग्रामविकासात्मक प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी समाजाभिमुख कार्यकर्त्याला मिळेल, असा विश्वासदेखील मंत्री बावनकुळे यांनी व्यक्त केला. सरकारने हा निर्णय लागू केल्यास नगरपालिका, महापालिकांप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा होणार आहे.

## सदिच्छा भेट



**मुंबई :** राज्याचे कॅबिनेट मंत्री दादाजी भुसे यांची आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट घेतली आणि विविध विषयांवर संवाद साधला.

## माणूसधर्माची पेरणी हा धार्मिक सौहार्दाचा वस्तुपाठ -डॉ. श्रीपाल सबनीस

### 'रयत'चे चेअरमन चंद्रकांत दळवी यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार प्रदान



**पुणे : प्रतिनिधी**

पिंपरी येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान करीत असलेली माणूसधर्माची पेरणी हा धार्मिक सौहार्दाचा वस्तुपाठ आहे, असे गौरवोद्गार ८९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी सोमवारी (दि.१३) पुण्यात काढले. पाली-मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते.

लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानच्या वतीने पुणे नवी पेठ येथील एस.एम. जोशी सभागृहात झालेल्या या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख, सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, बंडू पवार, पद्मा दळवी आणि लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

या वेळी माजी सनदी अधिकारी आणि रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार तसेच ज्येष्ठ लेखिका ललिता सबनीस यांना श्रीमती सखुबाई जगन्नाथ भारती आई सन्मान प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

डॉ. सबनीस पुढे म्हणाले की, सध्याच्या काळात जगात अशांतता, द्वेष वाढीस लागला असून सांस्कृतिक मूल्यांच्या या ऱ्हासपर्वात बाबा भारती प्रतिष्ठानचे जातपात, धर्मविरहित कार्य मानवता अधोरेखित करीत आहे. **(पान २ वर..)**






## वैभव खेडेकर अखेर भाजपमध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणातील मनसेचे पूर्वाश्रमीचे नेते आणि खेडचे माजी नगराध्यक्ष वैभव खेडेकर यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला आहे. मुंबईत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत खेडेकर पक्षप्रवेश सोहळा मंगळवारी (दि. १४) झाला. या वेळी खेडेकर यांच्या शेकडो समर्थकांनीही 'कमळ' हाती घेतले. यामुळे कोकणात भाजपची ताकद आणखी वाढली आहे.

वैभव खेडेकर हे कोकणातील मनसेचे महत्त्वाचे नेते होते. मनसेच्या स्थापनेपासून खेडेकर हे राज ठाकरे यांच्यासोबत होते, मात्र गेल्या काही काळापासून ते नाराज होते. खेडेकर यांचा जनसंपर्क चांगला आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपाला फायदा होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे खेडेकर हे आता पक्षात नसल्याने मनसेला फटका बसण्याची चिन्हे आहेत.

दरम्यान, या वेळी मनसेचे माजी रायगड जिल्हाध्यक्ष मनीष खवळे, खोपोलीतील मितेश शहा यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला.

## बस पेटून १२ प्रवाशांचा मृत्यू

**जैसलमेर : वृत्तसंस्था**

राजस्थानच्या जैसलमेर जिल्ह्यात मंगळवारी (दि. १४) एका खासगी बसला भीषण आग लागून १२ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना घडली. यातील अनेक प्रवासी गंभीर भाजल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

८७ प्रवासी असलेले ही बस जैसलमेरवरून जोधपूर येथे जात होती. वॉर म्युझियमजवळ उभी असताना अचानक या बसने पेट घेतला. या वेळी काही प्रवासी खिडक्या आणि दरवाज्यातून बाहेर आले, मात्र अन्य प्रवासी आत अडकले आणि आगीच्या तावडीत सापडले. दरम्यान, मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी या अपघाताबद्दल दु:ख व्यक्त केले असून जखमींवर तातडीने उपचार करण्याचे आदेश दिले आहेत.

## यंदा थंडीचीही लाट येणार!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशभरात मुसळधार पावसाने कहर केलेला असतानाच आता थंडीचीही लाट पसरणार आहे. स्वेटर, कानटोपी, हातमोजे, ब्लँकेट कमी पडतील एवढा गारवा असणार असून या वर्षीचा हिवाळा हा मागील ११० वर्षांतील तिसरा सर्वात थंड हिवाळा असण्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे.



प्रशांत महासागरातील ला-निना या नैसर्गिक हवामान बदलाच्या पॅटर्नमुळे यंदा भारतात थंडी अधिक तीव्र आणि दीर्घकाळ टिकणारी असेल. ला-निना ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये प्रशांत महासागरातील पृष्ठभागाचे तापमान सामान्यपेक्षा थंड होते. याचा परिणाम जागतिक हवामान प्रणालीवर होतो आणि भारतात अनेकदा यामुळे कडाक्याची थंडी पडते.

उत्तर आणि मध्य भारताच्या मैदानी प्रदेशात कडाक्याची थंडी पडू शकते. थंडीचा कालावधी सामान्य वर्षांच्या तुलनेत अधिक लांबण्याची शक्यता आहे. दिल्ली, पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या राज्यांसह उत्तर भारताच्या अनेक भागांमध्ये तापमानात मोठी घट दिसेल.



# खारेपाट येथील पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करावा -पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील




**पेण : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील खारेपाट गाव आणि परिसरात तातडीने क्षेत्रीय पातळीवर पाहणी करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

मंत्रालयात रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील खारेपाट परिसरातील पाणीटंचाईसंदर्भात बैठक झाली. बैठकीस आमदार रविशेठ पाटील, पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, जल जीवन मिशनचे व्यवस्थापकीय संचालक ई. रवींद्रन, सहसचिव गीता कुलकर्णी तसेच मुख्य अभियांता प्रशांत भामरे आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, जनतेसाठी अत्यावश्यक असलेल्या पाण्याचा प्रश्न कोणत्याही परिस्थितीत प्रलंबित राहू नये. अधिकारी व अभियंते यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी करून जलस्रोत, पाईपलाईन, पंपिंग स्टेशन इत्यादींचा आढावा घेऊन त्वरित सुधारणा कराव्यात. जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेली सर्व कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर द्यावा. शहापाडा परिसरातील सर्व गावे आणि वस्त्यांपर्यंत स्वच्छ आणि पुरेसे पाणी पोहचेल, यासाठी नियोजन आणि समन्वयांनी कामे करावीत, असे निर्देशही त्यांनी दिले.

## जि.प. आणि पं.स. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर
# मुरुडमध्ये भाजपची आढावा बैठक

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगर परिषद निवडणूकांचे आरक्षण जाहीर झाले असून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोर्चेबांधणीला सुरुवात झाली असल्याचे दिसून येत आहे. या निवडणुकीच्या तोंडावर मुरुडमध्ये खासदार धैर्यशील पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदेच्या विश्रामगृहात एक बैठक घेण्यात आली.

सुरुवातीला माजी तालुकाध्यक्ष महेंद्र चौलकर यांनी उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात आली. बैठकीत आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपरिषद निवडणूका डोळ्यासमोर ठेवून बहुमताने निवडून येण्याच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण विचार विनिमय करण्यात आला.

या वेळी खासदार धैर्यशील पाटील, दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष आलाप मेहता, महेश मोहिते, आस्वाद पाटील, ज्येष्ठ नेते अण्णा



कंधारे आदींनी आपले विचार मांडले.

या बैठकीस भाजपचे शैलेश काते, प्रवीण बैकर, महेश मानकर, बाळा भगत, सुधीर पाटील, रमेश दिवेकर, धर्माजी हिरवे, उमेश माळी यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांचीही उपस्थिती होती. या बैठकीमुळे मुरूड भाजपमध्ये नवा उत्साह संचारल्याचे चित्र दिसून येत आहे.

# रसायनी पोलिसांनी मोबाईल चोरांच्या आवळल्या मुसक्या

**चौक, मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्यौगिक परिसरातील वानिवली येथील वंडरशेफ होम अप्लायन्सेस प्रा. लि. कंपनीतील कामगारांचे १५ अँड्राईड मोबाईल कंपनीतील सिक्युरिटी केबीनचा दरवाजा उघडून घरफोडी करुन चोरट्यांनी लांबविले. या प्रकरणी तीन आरोपींना रसायनी पोलिसांनी मुंबई डोंगरी येथून पकडले.

घटनेची रसायनी पोलिसांना खबर मिळताच रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय बांगर हे पथकासह घटनास्थळी पोहचले. गुन्ह्याचे घटनास्थळावरील सीसीटीव्ही कॅमे-यांची पडताळणी केली असता तीन अनोळखी इसम हे कंपनीमध्ये प्रवेश करुन सिक्युरिटी केबीनचा दरवाजा ढकलुन आत घुसून कामगारांचे मोबाईल चोरी करीत असताना दिसून आले. सदर सीसीटीव्ही कॅमे-या मधील अनोळखी इसम यांची बातमीदारांमार्फत माहिती घेतली असता सदर इसम हे कॉन्ट्रॅक्टरकडे कामास असून त्यांची नावे मोहम्मद इकरार मोहम्मद इसराज, मोहम्मद आजम मोहम्मद शरीफ आणिरिझवान नदीम शेख असे असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

सदर इसमांना ताब्यात घेणेकरीता ते राहत असलेल्या त्यांच्या वानिवली येथील चाळीमध्ये पोलीस पथक पोहचले असता ते रात्रीचे त्यांच्या मुळ गावी उत्तरप्रदेश येथे जाण्याचा तयारीत असल्याची माहिती मिळाली.यावेळी मुंबई येथे पथक रवाना केले त्या दरम्यान पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी तांत्रीक पुराव्यांच्या विश्लेषण करुन मुंबई येथे शोध घेणेकरिता गेलेले पोलीस पथकास मार्गदर्शन करुन तसेच पोलीसांनी गोपनिय बातमीचे आधारीत संपुर्ण कौशल्यपुर्ण तपासा वरून सदर तीन्ही आरोपीत यांना डोंगरी मुंबई येथून सापळा रचून शिताफीने ताब्यात घेण्यात आले. आरोपीना अटक करण्यात आली असून त्यांनी चोरी केलेले सर्व १५ मोबाईल त्यांच्याकडून हस्तगत करण्यात आले आहेत. वरिष्ठ पालीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेमंत कोकाटे तपास करीत आहेत.

# आरसीएफ प्रकल्पग्रस्तांसाठी शिवसेनेचे आंदोलन
## अलिबाग-रेवस मार्गावरील वाहतूक पाच तास ठप्प

**अलिबाग : प्रतिनिधी**

आरसीएफ प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित नोकऱ्यांचा प्रश्न चिघळला आहे. आमदार महेंद्र दळवी यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने थळ प्रकल्पासमोर आंदोलन केले. या वेळी प्रकल्पग्रस्तांनी अलिबाग-रेवस मार्गावरील वाहतुक पाच तास रोखून धरली. प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नावर तातडीने बैठक घेण्याचे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

आरसीएफ प्रकल्पातील उर्वरित प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घ्या या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात एक बैठक आयोजित करण्यात आली होती. उद्योगमंत्री सामंत दृकश्राव्य माध्यमातून सहभागी झाले होते. या वेळी आठ दिवसांत उर्वरित १४१ प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घ्या; अन्यथा उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार मंगळवारी



सकाळी प्रकल्पग्रस्तांनी थळ प्रकल्पाच्या मुख्य व्दारासमोर आंदोलनाला सुरूवात केली. सकाळी नऊ वाजल्यापासून प्रकल्पग्रस्त कंपनीच्या गेट समोर जमा होण्यास सुरुवात झाली होती. ११ वाजता जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी प्रकल्पग्रस्तांना चर्चेसाठी येण्याची विनंती केली. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात बैठक झाली. या वेळी पोलीस अधीक्षक आँचल दलाल उपस्थित होत्या, मात्र आरसीएफ कंपनी प्रशासनाचे अधिकारी चर्चेसाठी आले नाहीत. त्यामुळे चर्चा फिसकटली. आंदोलकांच्या भावना शासनाला कळवल्या जातील मात्र तोवर आंदोलन स्थगित करावे ही विनंती प्रकल्पग्रस्तांनी धुडकावून लावली. यानंतर अलिबाग-रेवस मार्गावरील वाहतूक रोखून धरली. मागण्या मान्य होणार नाही तोवर मागे हटणार नाही असा इशारा या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी दिला. १७ तारखेपासून वडखळ आणि मांडवा येथून अलिबागकडे येणारी वाहतूक रोखण्याचा इशारा त्यांनी दिला. पाच तास या मार्गावरील वाहतूक ठप्प होती.

अखेर पोलिसांनी हस्तक्षेप करत तीन वाजता मार्ग मोकळा करून दिला. कंपनीजवळही जवळ मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

*आरसीएफ प्रकल्पग्रस्तांचा लढा आम्ही गेली ४० वर्षे लढतो आहोत, परंतु आरसीएफ प्रशासनाच्या आडमुठ्या भूमिकेमुळे त्याला यश येत नाही. आता मात्र ही आरपारची लढाई आहे. आजचे गेटसमोरील आंदोलन थांबवले असले तरी बुधवारी साखळी उपोषण आणि त्यानंतर आणखी आक्रमक आंदोलन होईल. यशस्वी होईपर्यंत लढा सुरूच राहील.*

**-महेंद्र दळवी,** आमदार

## माजी आमदार सुरेश लाड यांच्या आंदोलनाला यश

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि दुर्गम भागातील शिक्षक बदली प्रकरणावरून सुरू असलेल्या आंदोलनाला अखेर यश मिळाले असून या शिक्षकांना कर्जत तालुक्यात रूजू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या संदर्भात माजी आमदार सुरेश लाड यांनी सोमवारी सकाळपासून जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या दालनात आंदोलन सुरू केले होते. शिक्षक बदलीच्या अन्यायाविरुद्ध लाड यांनी ठाम भूमिका घेत प्रशासनाला चर्चेसाठी भाग पाडले. जिल्हा परिषदेत दिवसभर सुरू असलेल्या चर्चेनंतर अखेर शिक्षकांच्या रूजू आदेशावर सहमती देण्यात आली. त्यामुळे लाड यांच्या आंदोलनाला यश आले आहे.

## जगद्गुरू शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज उद्या कर्जतमध्ये

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सावरगाव येथील मंदिरात शिवपिंड रौप्यकवच समर्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा ज्योतिषपीठाधीश्वर परमपूज्य जगद्गुरु शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज यांचे शुभहस्ते होणार असून त्यांचे धार्मिक प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सावरगाव येथे अशोक व सुभाष सावंत परिवाराने श्री शिवमंदिर उभारले आहे. तेथील मंदिरात शिवपिंड रौप्यकवच समर्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा गुरुवार दिनांक १६ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेआठ वाजता सुरु होणार आहे.

# खैराची अवैध वाहतूक वनखात्याने पकडली; महाडमध्ये कारवाई

**महाड : प्रतिनिधी**

महाड-पंढरपूर रस्त्यावर राजेवाडी गावाजवळ बोलेरो पिकअप वाहनातून खैराची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनासह आरोपीला पकडण्यात आले. वनखात्याला केलेल्या कारवाई खैराची अवैध वाहतूक उघडकीस आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील राजेवाडी गावाजवळील उड्डाण पुलाजवळ वन खात्याचे कर्मचारी गस्त करीत असताना एम एच. २३.डब्ल्यू२७७८ या या क्रमांकाच्या पिकअप वाहन संशयास्पद आढळल्याने त्याची तपासणी केली असता खैराचे सोलिव नग ९ व गाडीच्या हौदामध्ये खैर सालपा वजन अंदाजे ५००कि ग्राम आढळून




आल्याने या खैराच्या मालाचे वाहतूक केल्या बाबत संदीप उत्तम माने वाहन चालक मालक राहणार कारेगव्हाण तालुका बीड जिल्हा बीड या आरोपीस अटक केली असून त्याच्यावरती भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६(१) फ ४१/ २ब नुसार कारवाई केली असून वाहनाच्या मुद्देमानाचा अंदाजे सहा लक्ष रुपयाचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपी चार दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. याबाबत उपवनसंरक्षक रोहा व सहाय्यक वन संरक्षक रोहा यांच्या मार्गदर्शनाने वनक्षेत्रपाल महाड व वनपरिक्षेत्राधिकारी आशिष पाटील यांनी पुढील कारवाई केली.


**कामगार पाहिजेत**

पनवेलमधील मालवणी हॉटेल साठी 12th pass सुपरवायझर/कॅशिअर व वेटर पाहिजे आहे, पगारा व्यतिरिक्त राहण्याची व जेवणाची सोय आहे.

**संपर्क:८१०४४५३१६४/ ९८६०७७८१५३/ ८२९१७३४९३३**


पान २ वर..

# माणूसधर्माची पेरणी हा धार्मिक सौहार्दाचा वस्तुपाठ -डॉ. श्रीपाल सबनीस

निष्कलंक चारित्र्याचे अधिकारी असलेल्या चंद्रकांत दळवी यांच्या व्यक्तिमत्त्वात गाडगेबाबांचे संतत्व आणि गांधीजींचा सेवाभाव उतरला आहे. माणदेश आता दळवी यांच्या नावाने ओळखला जातो. त्यांच्या निढळ गावाच्या विकासावर प्रसिद्ध झालेला ग्रंथ हा जणू ग्रामीण गीता आहे. अण्णा हजारे आणि पोपटराव पवार यांच्या नामावलीत त्यांनी स्थान प्राप्त केले आहे. अर्थातच, सौ. पद्मा दळवी यांचे मोठे योगदान चंद्रकांत दळवी यांच्या कार्यामागे आहे.

सत्काराला उत्तर देताना चंद्रकांत दळवी यांनी, जीवनात संधी मिळणे महत्त्वाचे असते. सुमारे बेचाळीस वर्षांपासून निढळ या माझ्या गावाच्या विकासासाठी मी कटिबद्ध राहिलो आहे. कर्मवीर भाऊराव पाटील आणि लोकशिक्षक बाबा भारती यांचे कार्य एकसमान आहे, अशी भावना व्यक्त केली.

ललिता सबनीस यांनी, पाली भाषेच्या संदर्भात खूप मोठे कार्य करणाऱ्या बाबा भारती यांना सखुबाई भारती यांनी मोलाची साथ दिली. आपल्या आई-वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महेंद्र भारती जी सेवा करीत आहेत, त्याचा थोडासा अंगीकार तरुण पिढीने केल्यास वृद्धाश्रम बंद होतील, अशी कृतज्ञता व्यक्त केली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय मनोगतातून, कर्मवीर अण्णांच्या शिक्षण संकुलात 'कमवा अन् शिका' योजनेतून मी शिकलो, शिक्षक झालो आणि पुढे उद्योजक होऊन समाजकारणात आलो. राजकारणात कधीही कोणाशी शत्रुत्व पत्करले नाही, अशा शब्दांत आपला जीवनप्रवास कथन केला.

प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी प्रास्ताविक केले. पुरुषोत्तम सदाफुले, प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, प्राचार्य डॉ. एस.टी. साळुंखे, संजय मोहिते, अरुण गराडे, प्रभाकर वाघोले, रवींद्र भारती, निमिष भारती, प्रकाश कांबळे, विजय कांबळे, सचिन कांबळे यांनी संयोजनात सहकार्य केले. सीमा गांधी यांनी सूत्रसंचालन व प्रा.डॉ. कामायनी सुर्वे यांनी मानपत्राचे वाचन केले, तर महेंद्र भारती यांनी उपस्थितांचे आभार मानले.









## ग्रुप ग्रामपंचायत आदई
### मु. आदई, ता. पनवेल, जि.रायगड

दि. : ०७/१०/२०२५

### निविदा सुचना

ग्रामपंचायत आदई यांजकडून जाहीर सुचना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत आदई हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्र्यांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसिकरण निर्बिजीकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे पाणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांच्या कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत अनुभुवी संस्था यांनी आपल्या निविदा ग्रामपंचायत वहाळ येथे दि.२४/१०/२०२५ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत सादर करण्यात आलेल्या निविदा त्याच दिवशी उघडल्या जातील.

उघडलेल्या निविदा स्विकारणे किवा नाकरणे याचा अधिकार प्रशासक ग्रामपंचायत आदई यांचा राहील

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम१% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत आदई हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थान उभारणे व देखभाल पोपण लसिकरण आणि निर्विजीकरण करणे. | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रति श्वान) | ३०००.०० | दि.२४/१०/२०२५ | दि.२४/१०/२०२५ |

**अटी व शर्ती**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणी मंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी.
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूणे कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी.
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जवाबदारी, जेवणाची व औषधोपचाराची व्यवस्था करणे हे ठेकेदावर बंधनकारक राहिल
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहिल.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS व्दारे सादर करणे ठेकेदाराची जबाबदारी राहिल.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडुन दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या निमनाचे पालन करणे बंधनकारक राहिल
८. स्थानिक संनियत्रंण समिती यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करणेत येतील.
९ . वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**श्री. स्वप्नाली प्रशांत बागल**
**ग्रा.म .अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत आदई**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**श्री. संतोष नामदेव ठोंबरे**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत देवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**

## संपादकीय

# शांततेला संधी

इस्रायल-हमास शांतता कराराची अंमलबजावणी शनिवारी सुरू झाली आणि अखेर सोमवारी पश्चिम आशियात शांतता परतण्यासंदर्भात आशेचा किरण दिसू लागला.

**इस्रायल आणि हमास यांच्यात गेली दोन वर्षे सुरू असलेल्या संघर्षात बेचिराख झालेली गाझा पट्टी, तिथले भुकेले लोक आणि हाडांचे सापळे तेवढे उरलेली जखमी अवस्थेतील लहान मुले यांची छायाचित्रे पाहून जगभराला तेथील हृदयद्रावक परिस्थितीची कल्पना येत होती आणि आता हे युद्ध न थांबल्यास पॅलेस्टिनींचा नरसंहार होईल अशी भीती आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्था व्यक्त करीत होत्या. हमासने ७ ऑक्टोबर २०२३ रोजी केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलकडून हे युद्ध पुकारण्यात आले. त्यात हमासने सुमारे १२०० इस्रायली नागरिकांना मारले तर ६७ हजारांहून अधिक पॅलेस्टिनींचा यात बळी गेला आहे असे म्हटले जाते. संयुक्त राष्ट्रे आणि इतर काही मानवतावादी मदत करणाऱ्या संस्थांकडून तेथील धक्कादायक आकडेवारी जगासमोर येत होती आणि इस्रायल-हमास संघर्ष थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय दबाव वाढत चालला होता. या पार्श्वभूमीवर, इस्रायल आणि हमास यांनी गाझामध्ये युद्धबंदी आणि शांतता कराराच्या पहिल्या टप्प्यावर सहमती दर्शवली आहे, अशी घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ९ ऑक्टोबरला केली आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनीही तेथील संसदेत भाषण करताना या शांततेसाठी कटिबद्ध आहोत, असे जाहीर केले. शांतता करारात कबूल केल्यानुसार हमासने इस्रायलच्या सर्व २० जिवंत ओलिसांची सुटका सोमवारी केली. हमासने ४८ इस्रायली नागरिकांना ओलिस ठेवले होते. त्यातील २८ जणांचा मृत्यू झाला आहे. तर इस्रायलनेही सुमारे १९०० पॅलेस्टिनी कैदी, नागरिकांच्या मुक्ततेची प्रक्रिया सरू केली. दोन्ही बाजूंनी ओलिसांची सुटका होत असल्याचे प्रक्षेपण वाहिन्यांवरून दाखवण्यात आले. ओलिसांच्या २८ मृतदेहांपैकी चौघांचे मृतदेह इस्रायलकडे सोपवणार असल्याचेही हमासने सोमवारी जाहीर केले. इस्रायल आणि हमासमध्ये झालेल्या या शस्त्रसंधीबाबत अद्यापही काहिशी अनिश्चितता आहे, पण तरी शांततेसाठीची संधी दवडू नये, असे आवाहन डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलला केले, तर दहशत आणि हिंसेचा मार्ग कायमचा सोडून देण्याचे आवाहन ट्रम्प यांनी पॅलेस्टिनींना केले. या करारासाठीच्या वाटाघाटी इजिप्तमध्ये झाल्या. त्यात इजिप्त सरकारसह कतार, अमेरिका आणि तुर्की यांनीही मध्यस्थाची भूमिका बजावली. भारताने या शांततापर्वाचे स्वागत केले आहे. ट्रम्प यांच्या प्रामाणिक प्रयत्नांचे हे फलित आहे. त्यांच्या या प्रयत्नांना भारत मनापासून पाठिंबा देत आहे अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गाझातील शांतता प्रक्रियेचे कौतुक केले. या शांतता प्रकियेविषयी जगभरातच समाधान व्यक्त होत असले तरी येत्या काळात गाझा पट्टीवर नेमके कुणाचे प्रशासकीय अधिकार असणार आहेत हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे हा संघर्षविराम आहे की काय अशी आशंकादेखील व्यक्त होते आहे. हमासचे पूर्णपणे नि:शस्त्रीकरण व्हावे ही इस्रायलची अट अद्याप पूर्ण झालेली नाही. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू हे हमासचे उच्चाटन करण्याच्या निर्णयावर ठाम आहेत, परंतु हमासकडून पूर्णपणे शस्त्रे काढून घेण्याचा निर्णय अंमलात आणणे सुरू झाल्यास नव्याने संघर्ष सुरू होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होते आहे. तसे झाल्यास संभाव्य धोक्याकडे बोट दाखवून इस्रायलचे सैन्यही गाझातून पूर्ण माघार घेण्यास तयार होणार नाही. तूर्तास युद्धविरामाचा मोठा टप्पा पार पडल्याचे स्वागतच करायला हवे.**

# पनवेल मनपा कर्मचाऱ्यांना वाढीव सानुग्रह अनुदान द्या

## आमदार प्रशांत ठाकूर यांची आयुक्त मंगेश चितळे यांना सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे कामगार, कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना सन २०२५चा सानुग्रह अनुदान वाढवून देण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांची म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन चर्चा केली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तातडीने आयुक्त मंगेश चितळे यांच्याशी संपर्क साधून सानुग्रह अनुदानाच्या रकमेत लक्षणीय वाढ करावी, अशी सूचना केली आहे.



या भेटीत, विशेषतः शिक्षण विभाग आणि एनयुएचएम विभागातील कर्मचाऱ्यांच्या सानुग्रह अनुदानामध्येही वाढ करण्याची मागणी केली. या वेळी काही कर्मचारी सेवानिवृत्तीमुळे आवश्यक असलेले कामाचे दिवस पूर्ण करू शकत नसतील, तरी त्यांना सानुग्रह अनुदानापासून वंचित ठेवू नये. या कर्मचाऱ्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांनाही लाभ मिळावा यावर सकारात्मक चर्चा झाली.

या चर्चेवेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, सरचिटणीस अनिल जाधव, कोषाध्यक्ष दत्तगुरू म्हात्रे, कार्यालय प्रमुख महेंद्र गायकवाड, संजय जाधव, मुकेश वाघेला, श्री. राणे, रवींद्र गायकवाड, मनोज कांबळे, रवींद्र पाटील आदी उपस्थित होते.

# तक्का येथे फायबर इंटरनेटची अत्याधुनिक सुविधा उपलब्ध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील तक्का येथील बाबाजी लँडमार्क, एसबीआय एटीएमजवळ हिमेश इंटरनेट सर्व्हिस या नव्या कार्यालयाचे उद्घाटन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या नव्या कार्यालयाचे मालक पनवेल महानगरपालिकेचे माजी सभापती प्रभाकर बहिरा असून, या ठिकाणी नागरिकांना १०० टक्के ऑप्टिक फायबर इंटरनेटची अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उद्घाटनावेळी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, सुनील बहिरा, प्रभाकर बहिरा, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव, शहर सरचिटणीस अमित ओझे, सरचिटणीस रूपेश नागवेकर, उपाध्यक्ष केदार भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा रूचिता लोंढे, रघुनाथ बहिरा, प्रतिक बहिरा, हिमेश बहिरा आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रभाकर बहिरा यांना पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या तसेच केक कापुन त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. दरम्यान, या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही भेट देऊन शुभेच्छा दिल्या.





**पनवेल : तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी बेबी ठाकूर यांची नुकतीच बिनविरोध निवड झाली आहे. त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित सरपंच बेबी ठाकूर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी उपसरपंच किरण ढांगरकर, माजी सरपंच नितीन काठावले, माजी उपसरपंच प्रितेश डांगरकर, लहू ठाकूर, साईनाथ दळवी, बाळाराम ठाकूर, कच्छिंद्र ठाकूर आदी उपस्थित होते.**

# पनवेल महानगरपालिकेचा महाराष्ट्र शासनाकडून सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियानामध्ये सलग तीन वर्ष सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या राज्य वातावरणीय कृती कक्षाचे संचालक अभिजित घोरपडे यांच्या हस्ते पनवेल महानगरपालिकेस माझी वसुंधरा अभियान - हरित यशोगाथा सन्मान २०२५ बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, गोरेगाव, मुंबई येथे आज झालेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

या वेळी पनवेल महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्यावतीने उपायुक्त स्वरूप खारगे, पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, माझी वसुंधरा सल्लागार युवराज झुरंगे यांनी हा सन्मान स्वीकारला.





माझी वसुंधरा अभियानांतर्गत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या नेतृत्वात सर्व थिमॅटिक क्षेत्रांमध्ये पनवेल महानगरपालिकेने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तीन लाख ते दहा लाख लोकसंख्येच्या अमृत शहरे गटामध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल १४ ऑक्टोबर २०२५ रोजी IFAT इंडियाच्या व्यासपीठावरती पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग महाराष्ट्र शासन आणि राज्य वातावरणीय कृती कक्ष, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने संचालक अभिजीत घोरपडे यांनी हा माझी वसुंधरा अभियान - हरित यशोगाथा सन्मान २०२५ सन्मान पनवेल महानगरपालिकेचे प्रदान केला.

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी पनवेल महानगरपालिकेने प्रभावी पावले उचलली आहेत. यामध्ये धूळ नियंत्रण, हवेची गुणवत्ता तपासणी आणि शुद्धीकरणासाठी अत्याधुनिक साधनांचा वापर करून शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि नागरिकांना स्वच्छ हवा उपलब्ध करून देण्यासाठी अनेक प्रभावी उपाययोजना हाती घेतल्या आहेत.

### प्रस्तावित अन् सुरू असलेली कामे

शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी १० एअर प्युरिफिकेशन सिस्टीम्स बसविणार आहे. या प्रणालीमुळे हवेत असलेले सूक्ष्म प्रदूषक कण शोषले जाऊन वातावरण अधिक स्वच्छ राहील. हे प्रकल्प नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आणि पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी अत्यंत आवश्यक मानले जात आहेत. पनवेल महानगरपालिकेचे हे प्रयत्न शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणे हा या सर्व उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे.

# गरजू विद्यार्थ्यांना साहित्यवाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बामनडोंगरी येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये दोस्ती ग्रुपच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पेपर पॅड आणि रंगीत खडू यांसारख्या शैक्षणिक वापरासाठी महत्त्वाचे असलेले साहित्य देण्यात आले.



शालेय साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्टपणे दिसत होता. शाळेतील शिक्षकांनी दोस्ती ग्रुपच्या या सामाजिक उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले आणि त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी दोस्ती ग्रुप सदस्य बाबाजी कोकाटे, संदीप लवटे, अजित शेंडगे, विशाल पाटील, विकास निर्भवणे, तुषार देवळकर, कविराज बिराजदार, मनोज कोळी, सुनील कोळी, श्रीधर चव्हाण, विकास पाटील, संदीप बाबर, मच्छिंद्र मूळीक, पवन बांडे, मंगेश दबडे, सुरज कटारिया, कमलेश कटारे, शंकर नाईक आणि वैभव शेंडगे आदी उपस्थित होते.





**पनवेल : भाजपचे पनवेल उत्तर मंडळ उपाध्यक्ष निर्दोष केणी आणि सरचिटणीस विनोद घरत यांच्या माध्यमातून दिवाळी सणानिमित्त नागरिकांना उटणे वाटप करण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. याच उपक्रमांतर्गत मंगळवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनाही उटणे भेट देण्यात आले. या कार्यक्रमावेळी माजी सरपंच संतोष पाटील, भाजप उत्तर मंडळ उपाध्यक्ष निर्दोष केणी, माजी सरपंच विजश्री पाटील, सचिन वासकर, दीपक पाटील, देवांगी पाटील, ममता माळी, अनुराधा शुभदर्शनी, योगिता मसरे आदी उपस्थित होते.**

**पनवेल : भाजपचे शहर मंडळ उपाध्यक्ष केदार भगत दिवाळीनिमित्त उटणे वाटप करणार आहेत. त्यांच्या या उपक्रमाचा शुभारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत मंगळवारी झाले. या वेळी समीप मोहोकार, यज्ञेश पाटील, संतोष वर्तले, चेतन म्हस्कर, सुमित दसवते, ब्रिजेश बहिरा, पवन बोयडे, रोशन जाधव, चांद पटेल, विजय बहिरा, संकेत दसवते, सचिन जाचक, अथर्व पाटील, सचिन भगत आदी उपस्थित होते.**



# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात 'युवा निती २०२५'

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवारी (दि.१०) युवा निती हा कार्यक्रम उत्साहात झाला. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण, सामाजिक जाणीव आणि राष्ट्रभावना जागृत करण्याच्या उद्देशाने करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख हे होते तसेच बोर्ड ऑफ डायरेक्टर ॲड.राहुल घरत, पॉलिसी एक्सपर्ट विवेक सोनवणे, ॲड.राज सराफ गर्व्हमेंट लॉ कॉलेज, विद्यार्थी परिषद अध्यक्षा रेहा खानोलकर, महाराष्ट्र शासनाचे, पर्यावरण व हवामान बदल विभागाचे, हवामान अनुकूलन तज्ञ अमित भालेराव, इनफिनी फाउंडेशनचे अध्यक्ष अयुफ अकुला, प्राचार्य निशा नायर आदी उपस्थित होते.

धोरणात्मक चर्चा, कल्पना आणि नेतृत्वासाठी एक गतिमान युवक सहभाग मंच प्राचार्यांनी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन दिला म्हणून सर्वांनी त्यांचे आभार मानले.





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

